# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ३०/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.जयहिंद शंकर पाटील
मु.पो.विनायक, डोंगरआळी, केगाव
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय केगांव
ता.उरण, जि.रायगड

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय केगांव
ता.उरण, जि.रायगड

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ३०/७/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १५/९/२०२१ | ---- | २६/१०/२०२१ | १७/१२/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.६/१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ३०/७/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मधूकर मुकुंदे, ग्रामपंचायत अधिकारी केगावं उपस्थित आहेत. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, सध्या कार्यरत - ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती खालापूर जि.रायगड ऑनलाइन उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *दि.१३.०८.२०२१ रोजी ग्रा.प.केगांव यांच्या urgpkgaon@gmail.com या email id व्दारे D.P.World न्हावा शेवा कंपनीमध्ये (श्री.जयहिंद शंकर पाटील यांच्या नावाचा केलेल्या) ईमेलची प्रत*"

तद्‌नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१७/१२/२०२१ रोजी, *"जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील यांनी या आदेशाच्या तारखेपासुन दि.२४/१२/२०२१ या तारखेपर्यंत अपीलकार यांना माहिती पुरवावी."* असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना दि.२५/७/२०२५ च्या पत्राव्दारे माहिती दिली आहे. सदर पत्राची प्रत त्यांनी सादर केली.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे. तथापि तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत व प्रथम अपील निणयानंतरही माहिती का दिली नाही याबाबत काहीही स्पष्ट केलेले नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, ग्रामपंचायत अधिकारी केगांव यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १५/९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतरही त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात

येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१०/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० जुलै, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील, ग्रामपंचायत अधिकारी केगांव --
**- यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मुकुंदे,
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत केगांव,
ता.उरण जि.रायगड **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदरची प्रत संबधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणी आज दिनांक १०/९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी श्रीमती तृप्ती जयहिंद पाटील उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती खालापूर व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मुकुंदे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत केगांव उपस्थित आहेत.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील यांनी खुलासा केला की, ते दि.३०/७/२०२५ रोजीच्या सुनावणीस ऑनलाइन उपस्थित होते. तक्रारकर्ता यांनी माहिती अधिकारात मागितलेली माहिती दि.२३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे. सदर पत्राची प्रत त्यांनी सादर केली. त्यावर तक्रारकर्ता श्री.जयहिंद पाटील यांची स्वाक्षरी दिसून येते. तथापि तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी सदर माहिती प्राप्त झालेली नाही असे नमूद केले व दि.२३/१२/२०२१ रोजीच्या पत्रावरील स्वाक्षरी श्री.जयहिंद पाटील यांनी केली नसल्याचे त्यांनी नमूद केले. ही स्वाक्षरी असलेली दि.२३/१२/२०२१ रोजीचे पत्राची कार्यालयीन प्रत/मूळ प्रत आपणास दर्शवावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील यांनी दि.२३/१२/२०२१ रोजीच्या पत्राव्दारे जी माहिती दिली आहे, त्या पत्रावर जर श्री.जयहिंद पाटील यांची स्वाक्षरी नाही असे जर त्यांचे म्हणणे असेल तर त्याबाबत श्री.जयहिंद पाटील यांनी आयोगास लेखी तक्रार करणे अपेक्षित आहे. पुढील सुनावणीस सदर कागद सादर करावा. त्यांनतर पुढील आदेश देण्यात येतील. पुढील सुनावणी दि.४/११/२०२५

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगांव यांनी पुढील सुनावणीस दि.२३/१२/२०२१ रोजीचे पत्राची कार्यालयीन प्रत/मूळ प्रत आयोगास सादर करावी. त्यानंतर सदर प्रकरणाबाबत पुढील आदेश देण्यात येतील.
२. पुढील सुनावणीस तक्रारकर्ता, विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे.
३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.४/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील, ग्रामपंचायत अधिकारी केगांव --
**- यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मुकुंदे,
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत केगांव,
ता.उरण जि.रायगड **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदरची प्रत संबधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मधूकर मुकुंदे, ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत केगांव व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती खालापूर उपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत केगांव यांनी त्यांच्या दि.८/१०/२०२५ च्या पत्राद्वारे अहवाल सादर केला की, तक्रारदार यांच्या अर्जानुसार व आयोगाच्या दि.१०/९/२०२५ रोजीच्या आदेशानुसार दि.२३/१२/२०२१ च्या पत्राची कार्यालयीन प्रत/मूळ प्रत आयोगास सादर करावी व त्यानंतर पुढील आदेश देण्यात येतील यावरून दि.२३/१२/२०२१ रोजीच्या पत्राची ओरीजनल मूळ प्रत ग्रामपंचायत केगांवच्या दप्तरी शोध घेणेत आला असता सदरची मूळ प्रत दप्तरी आढळून आली नाही याबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना जा.क्र.५७४ दि.२५/७/२०२५ नुसार अर्जदार यांना माहिती पुरविणेत आली आहे.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील यांनी निवेदन केले की, त्यांनी दि.२३/१२/२०२१ रोजी तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आली होती. ती माहिती देण्यासाठी ग्रामपंचायत शिपायांना पाठविण्यात आले होते व त्यावर शिपायाची स्वाक्षरी घेतली होती. सदर मूळ ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होती तथापि आपण कार्यभार सोडून ४ वर्ष झाले असल्याने ती उपलब्ध नसल्यामुळे आपण त्याबाबात कोणताही खुलासा करू शकत नाही.

तक्रारकर्ता यांनी तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील यांच्याविरूध्द गंभीर स्वरूपाची तक्रार केली आहे. त्यांना दि.२३/१२/२०२१ रोजी प्रत्यक्षात माहिती न देता त्यांची स्वाक्षरी दुस-या कागदपत्रांवरून क्रॉप करून ती या पत्रावर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उमटविण्यात आली व खोटे कागदपत्र तयार करून तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आली आहे असा तक्रारकर्ता यांचा आक्षेप आहे. अशा परिस्थितीत तक्रारकर्ता यांच्या मूळ स्वाक्षरीचे पत्र ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध असणे आवश्यक होते. त्यावरून तक्रारकर्ता यांच्या मूळ स्वाक्षरीबाबत खुलासा झाला असता तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्या अहवालानुसार सदर पत्र प्रत ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध नाही. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी होणे आवश्यक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. उपरोक्त विवेचनात नमूदप्रमाणे गट विकास अधिकारी, पंचायत समिती उरण यांनी या प्रकरणाची स्वत: चौकशी करून १ महिन्याच्या आत वस्तुस्थितीबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा. तसेच या प्रकरणात दोषी आढून आलेल्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द ते काय कार्यवाही करणार आहेत याबाबतचा लेखी अहवाल पुढील सुनावणीस सादर करावा.
२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.४/१२/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती उरण,
ता.उरण जि.रायगड